मुख्य माहिती आयुक्त-राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.५४२/०२

श्री.एस.व्ही.कल्याणकर
घर नं.१०७६,डी वॉर्ड,शुक्रवार पेठ,
तेली गल्ली,कोल्हापूर.

अपीलकर्ता

वि रु ध्द

अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय कृषी सह संचालक,
कोल्हापूर विभाग,कोल्हापूर.

उत्तरवादी

## <u>वि वे च न</u>

श्री.एस.व्ही.कल्याणकर यांनी सह कृषी संचालक,कोल्हापूर यांचे कार्यालयातील जन माहिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी यांचेकडे केलेला अर्जात जी माहिती मागवली आहे ती मिळत नसल्याच्या संदर्भात आयोगाकडे अपील केले. असे दिसते की, अर्जदाराने त्यांचे बंधू श्री.विलास विठ्ठल कल्याणकर हे अनेक वर्षापासून एकाच कार्यालयामध्ये कार्यरत आहेत. तेव्हा ते कोणत्या शासन निर्णयाखाली एकाच ठिकाणी वर्षानुवर्षे काम करु शकतात, त्या शासन निर्णयाच्या प्रतीची मागणी केली आहे. अशा प्रकारचा शासन निर्णय नाही म्हणून तो देण्याचा प्रश्नच उदभवत नाही असे अर्जदारास कळविण्यात आले आहे. असे दिसते की, गेल्या काही वर्षापासून श्री.शशिकांत कल्याणकर व त्यांचे बंधू श्री.विलास विठ्ठल कल्याणकर,लिपिक हे विभागीय कृषी सह संचालक,कोल्हापूर यांची एकच ठिकाणी जास्त सेवा झाल्यामुळे कोल्हापूर जिल्हयाबाहेर बदली करण्याबाबत वेगवेगळया प्राधिका-यांकडे तक्रार करत आहेत. या संदर्भात त्यांना मिळालेल्या उत्तराने व अपिलीतील निर्णयाने समाधान न झाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे धाव घेतली आहे.

या त्यांच्या अपिलाची व पत्राची सुनावणी दिनांक ७.१२.२००६ रोजी पुणे मुक्कामी घेण्यात आली. त्यावेळी अर्जदार तसेच माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी उपस्थित होते. याबाबत कर्मचा-यांची बदली व एका जागी असण्याचा कालावधी या संबधी जो दिनांक १५.१.२००४ चा शासन अध्यादेश आहे त्याची प्रत अर्जदाराकडे आहेच. कारण त्यांनी त्यांच्या एका अर्जात त्याची प्रत जोडली आहे. जन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांनाही जुना माहितीचा अधिकार कायदा व नवीन अधिनियम या अंतगर्त आतापर्यंत ६ वेळा अर्ज दिले आहेत. त्यांच्या अर्जामध्ये त्यांनी त्यांच्या बंधूची बदली कोल्हापूर जिल्हयाबाहेर करणे सूचित केले आहे. ही बाब माहितीच्या अधिकारात बसत नाही. अपिलीय अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, श्री.वि.वि.कल्याणकर,लिपिक यांची एकाच कार्यालयात ३ वर्षे पूर्ण झाली असली तरी ते चांगले काम करणारे कर्मचारी असून त्यांचे विरुध्द कार्यालयीन कामाबाबत कोणतीही तक्रार नाही, व त्यांना अतिउत्कृष्ट

कामाबाबत सन २००२ मध्ये शासनाने आगाऊ एक वेतनवाढ मंजूर केली आहे. तसेच ते अपंग कर्मचारी आहेत. त्यांचे बंधू श्री.शशिकांत कल्याणकर हे घरगुती वाद-विवादातून आकसबुध्दीने व खाजगी कारणास्तव, त्यांच्या बदलीची मागणी करीत असतात. त्यांची बदली जिल्हयाबाहेर केल्यास सध्या ते वापरत असलेले वडिलोपार्जित घर बळकविणेचे दृष्टीने अर्जदार अर्ज करत आहेत असे श्री.वि.वि.कल्याणकर,लिपिक यांना विचारणा केली असता त्यांनी लेखी दिले आहे, असेही अपीलीय अधिकारी यांनी स्पष्ट केले आहे.

वरील विवेचनावरुन असे स्पष्ट होते की, अर्जदाराचा हेतू हा माहिती मिळविणेचा नसून त्यांची तक्रार आहे ती श्री.वि.वि.कल्याणकर,लिपिक यांची सध्या असलेल्या जागेवरुन कोल्हापूर जिल्हयाच्या बाहेर बदली करण्याबाबत आहे. याबाबत शासनाच्या धोरणाप्रमाणे सर्वसाधारणपणे एका पदावर राहण्याचा कालावधी तीन वर्षाचा असतो. असे असताना श्री.वि.वि.कल्याणकर यांच्या त्यापेक्षा जास्त अवधिसाठी एका जागेवर राहण्याबाबत अर्जदाराचा आक्षेप असेल तर त्यांनी त्याची तक्रार शासनाच्या संबंधित विभागाकडे करावी. शासनाचे बदलीचे बाबतीत धोरण अर्जदारास माहित आहेच.

## आ दे श

अपील फेटाळण्यात येत आहे.

(सुरेश वि. जोशी),
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्र.५४२/०२

श्री.एस.व्ही.कल्याणकर
घर नं.१०७६,डी वॉर्ड,शुक्रवार पेठ,
तेली गल्ली,कोल्हापूर.

अपीलकर्ता

वि रु ध्द

अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय कृषी सह संचालक,
कोल्हापूर विभाग,कोल्हापूर.

उत्तरवादी

## वि वे च न

श्री.एस.व्ही.कल्याणकर यांनी सह कृषी संचालक,कोल्हापूर यांचे कार्यालयातील जन माहिती अधिकारी व अपीलीय प्राधिकारी यांचेकडे केलेला अर्जात जी माहिती मागितली आहे ती मिळत नसल्याच्या संदर्भात आयोगाकडे अपील केले. असे दिसते की, अर्जदाराने त्यांचे बंधू श्री.विलास विठ्ठल कल्याणकर हे अनेक वर्षापासून एकाच कार्यालयामध्ये कार्यरत आहेत. तेव्हा ते कोणत्या शासन निर्णयाखाली एकाच ठिकाणी वर्षानुवर्षे काम करु शकतात, त्या शासन निर्णयाच्या प्रतीची मागणी केली आहे. अशा प्रकारचा शासन निर्णय नाही म्हणून तो देण्याचा प्रश्नच उदभवत नाही असे अर्जदारास कळविण्यात आले आहे. असे दिसते की, गेल्या काही वर्षापासून श्री.शशिकांत कल्याणकर हे त्यांचे बंधू श्री.विलास विठ्ठल कल्याणकर,लिपिक हे विभागीय कृषी सह संचालक,कोल्हापूर यांची एका ठिकाणी जास्त सेवा झाल्यामुळे कोल्हापूर जिल्हयाबाहेर बदली करण्याबाबत वेगवेगळया प्राधिका-यांकडे तक्रार करत आहेत. या संदर्भात त्यांना मिळालेल्या उत्तराने व अपिलीतील निर्णयाने समाधान न झाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे धाव घेतली आहे.

या त्यांच्या अपिलाची व पत्राची सुनावणी दिनांक ६.१२.२००६ रोजी पुणे मुक्कामी घेण्यात आली. त्यावेळी अर्जदार तसेच माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी उपस्थित होते. याबाबत कर्मचा-यांची बदली व एका जागी असण्याचा कालावधी या संबधी जो दिनांक १५.३.२००४ चा शासन अध्यादेश आहे त्याची प्रत अर्जदाराकडे आहेच. कारण त्यांनी त्यांच्या एका अर्जात त्याची प्रत जोडली आहे. जन माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांनाही जुना माहितीचा अधिकार कायदा व नवीन अधिनियम या अंतगर्त आतापर्यंत ६ वेळा अर्ज दिले आहेत. त्यांच्या अर्जामध्ये त्यांनी त्यांच्या बंधूची बदली कोल्हापूर जिल्हयाबाहेर करणे सूचित केले आहे. ही बाब माहितीच्या अधिकारात बसत नाही. अपीलीय अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की, श्री.वि.वि.कल्याणकर,लिपिक यांची एकाच कार्यालयात ३ वर्षे पूर्ण झाली असली तरी ते चांगले काम करणारे कर्मचारी असून त्यांचे विरुध्द कार्यालयीन कामाबाबत कोणतीही तक्रार नाही, व त्यांना अतिउत्कृष्ट

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे १

श्री. ज्ञानेश्वर मुरलीधर भोसले
रा. तर्डोबाची वाडी, ता. शिरुर, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
तहसीलदार शिरुर, ता. शिरुर जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
प्रभारी नायब तहसीलदार, शिरुर
ता. शिरुर जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. ज्ञानेश्वर मुरलीधर भोसले
रा. तर्डोबाची वाडी, ता. शिरुर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, शिरुर, ता.शिरुर, जि. पुणे
श्री. उदयसिंह भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा प्रभारी नायब तहसीलदार, शिरुर
ता. शिरुर, जि. पुणे श्रीमती एम.एल. धोत्रे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.८.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

दि. १५.६.२००६ रोजी तहसील कार्यालय शिरुर येथे दिलेल्या अर्जाबाबत तहसीलदार, मंडल अधिकारी, तलाठी या सर्वांनी मिळून तर्डोबाची वाडी येथील विना परवानगीने चाललेली वीटभट्टी शासकीय नियमानुसार गेले ३० वर्षांपासून बंद केली किंवा नाही, दिलेल्या अर्जानुसार वीटभट्टी का बंद केली नाही, वीटभट्टी परवाना लेखी स्वरुपात मिळावा. वीटभट्टी शासकीय नियमानुसार बंद करण्यात यावी. वीटभट्टी बंद केली म्हणून सदरचे जाबजबाब तहसीलदारसो, मंडल अधिकारी, तलाठी यांनी लेखी स्वरुपात देणेबाबत माहिती

## विवेचन

तर्डोबाची वाडी येथे विनापरवानगीने गेल्या ३० वर्षात चाललेली वीटभट्टी बंद केली किंवा नाही, दिनांक ६.२.२००६ रोजी दिलेल्या अर्जानुसार वीटभट्टी का बंद केली नाही, अशी माहिती अपीलकर्ता श्री.ज्ञानेश्वर मुरलीधर भोसले यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरुर, श्रीमती एम.एल.धोत्रे यांच्याकडे मागितली होती. श्री.भोसले यांनी मागितलेली माहिती कारवाईच्या स्वरुपाची विचारणा करणारी आहे, ती केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये नमूद केलेल्या 'माहिती 'या सदरात मोडत नाही. गौण खनिज उत्खननाबाबत वसुलीच्या पुस्तिकेवरुन देऊ केलेली माहिती घेण्यास श्री.भोसले यांनी नकार दिला, तसेच अपिलावरील निर्णय स्वीकारण्यासही त्यांनी नकार दिला, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरुर श्री.उदयसिंह भोसले यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले. अपीलकर्त्याने निवेदनात वापरलेली भाषा असभ्यपणाची असल्याचे प्रतिपादन श्री.उदयसिंह भोसले यांनी केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांना दि.५.२.२००६ रोजी श्री.भोसले यांनी सादर केलेल्या निवेदनातील पुढील मजकुराकडे त्यांनी लक्ष

वेधले: ' आपले काळे तोंड पाहण्याची माझी इच्छा नाही, आपली लायकी किती आहे हे आमच्या निदर्शनास आले आहे...... गरिबांवर अन्याय करु नका, गरीब जर पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे पिसाळला तर आपल्याला चावल्याशिवाय राहणार नाही, कदाचित आपला मृत्यूही होईल'.

तहसीलदार कार्यालयात आत्महत्त्येचा प्रयत्न केल्याबद्दल श्री.भोसले यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा नोंदविण्यात आला असून त्यांच्याविरुध्द कार्यवाही चालू आहे, असे श्री.उदयसिंह भोसले यांनी नमूद केले.

वरील बाबी लक्षात घेता, वीटभट्टीच्या परवान्याच्या प्रतिव्यतिरिक्त अपीलकर्त्याच्या मागणीतील कोणतीही बाब 'माहिती ' या सदरात मोडत नाही. अन्य संदर्भाचा व वीटभट्ट्या बंद करण्याच्या मागणीचा विचार केंद्रिय माहितीचा अधिकार २००५ मध्ये करण्याचे कारण नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. १०.१२.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्रीमती शकीनाबी अजमुद्दीन मुलाणी
मु.पो.केम, ता. करमाळा, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
अध्यक्ष, जात पडताळणी समिती
(अतिरिक्त आयुक्त, पुणे महसूल विभाग,)
विधान भवन, पुणे-४११ ००१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
विभागीय समाज कल्याण अधिकारी,
पुणे विभाग, पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१२.२००७ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्रीमती शकीनाबी अजमुद्दीन मुलाणी
मु.पो.केम, ता. करमाळा, जि. सोलापूर

**जन माहिती अधिकारी तथा** विभागीय समाज कल्याण अधिकारी,
पुणे विभाग, पुणे-३७ यांचे तर्फे संशोधन अधिकारी श्री. प्रमोद जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २३.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | १३.२.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | ७.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

विभागीय समाज कल्याण अधिकारी, पुणे विभाग, पुणे कार्यालयातील विभागीय जाती पडताळणी समितीतर्फे जातीची पडताळणी झालेली असून पडताळणी समितीने दि. ४.७.२००० रोजी जातीचे वैधता प्रमाणपत्र दिलेले आहे, त्या प्रमाणपत्राची सही - शिक्क्याची प्रत

## विवेचन

विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीने दि. ४.७.२००० रोजी आपल्याला दिलेल्या जातीच्या वैधता प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत अपीलकर्त्या श्रीमती शकीनाबी अजमुद्दीन मुलाणी यांनी जन माहिती अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे मागितली होती. ती न मिळाल्यामुळे श्रीमती मुलाणी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष, जाती पडताळणी समिती (अतिरिक्त आयुक्त, महसूल विभाग, पुणे ) यांच्यांकडे केली होती. चार महिने उलटून गेल्यानंतरही अपिलाचा निर्णय न दिल्यामुळे व तीन स्मरणपत्रे पाठवूनही दखल न घेतल्यामुळे श्रीमती मुलाणी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्रीमती मुलाणी या केम, ता. करमाळा जि. सोलापूर येथील श्री विठ्ठल देवस्थान ट्रस्ट, केम संचलित प्राथमिक आश्रम शाळेच्या स्थापना दि. ३.१०.१९९६ पासून शिक्षिका म्हणून सेवेत आहेत. या शाळेतील सेवेच्या अनुषंगाने विभागीय जाती पडताळणी समितीतर्फे पडताळणी होऊन दि. ४.७.२००० रोजी त्यांचे जातीचे वैधता प्रमाणपत्र दिले गेले. त्याची छायांकित प्रत श्रीमती मुलाणी यांनी अर्जासोबत जोडली असून मूळ प्रमाणपत्र आपल्याला मिळाले नसल्यामुळे प्रमाणित प्रतीची मागणी माहितीच्या अधिकारात केली. प्रलंबित अपिलांच्या संदर्भात विचारणा करणारे पत्र आयोगाने सर्व संबंधितांना दि. १९.१०.२००७ रोजी पाठविले. या पत्राच्या अनुषंगाने सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती श्री. प्रमोद जाधव यांनी श्रीमती मुलाणी यांना दि. ५.११.२००७ रोजी उत्तर पाठविले. जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीवर कामाचा प्रचंड ताण असून तुलनेने अतिशय कमी कर्मचारी वर्ग समितीकडे आहे. अन्य कार्यालयातील कर्मचाऱ्यांकडून तात्पुरती

कामकाज व्यवस्था अंतर्गत काम करुन घेण्यात येत आहे, असे श्री. प्रमोद जाधव यांनी या पत्रात नमूद केले आहे व आधीच कमी असणारी साधनसामुग्री या कामासाठी प्रमाणाबाहेर वळवावी लागणार आहे. त्यामुळे माहिती देण्यास विलंब होत आहे, असे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००७ चे कलम ७(९) चा हवाला देऊन म्हटले आहे. प्रमाणपत्राची एक प्रत देण्यासाठी साधनसामुग्री प्रमाणाबाहेर कशी वळवावी लागेल, याचा खुलासा करताना श्री. जाधव यांनी आपल्या कार्यालयाकडे एकच कर्मचारी उपलब्ध असल्याचे नमूद केले. दि. ४.७.२००० रोजी जातीचे वैधता प्रमाणपत्र दिल्याचे श्रीमती मुलाणी यांनी नमूद केले असल्यामुळे त्या दिवसाची संपूर्ण कागदपत्रे व अन्य नोंदी आपण तपासल्यानंतरही अशा प्रमाणपत्राबाबतची नोंद आढळली नाही, असे त्यांनी स्पष्ट केले व त्या संदर्भातील दि. ४.७.२००० च्या नोंदीची कागदपत्रे आयोगाला सादर केली. त्यात या प्रमाणपत्राची नोंद आढळली नाही. श्रीमती मुलाणी यांनी अर्जासोबत वैधता प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडली आहे, याचाच अर्थ वैधता प्रमाणपत्र त्यांना मिळाले आहे, असा होतो, असे श्री. जाधव यांनी दि. ५.११.२००७ रोजीच्या पत्रातही म्हटले आहे. त्याचाच पुनरुच्चार त्यांनी आयोगापुढील सुनावणीत केला. परंतु ही प्रत आपण शाळेच्या मुख्याध्यापकांकडून मिळविली असल्याचे व मूळ प्रत आपल्याला मिळाली नसल्याचे श्रीमती मुलाणी यांनी सांगितले. जात प्रमाणपत्र पडताळणी झाल्यावर संबंधित व्यक्ती काम करत असलेल्या कार्यालयास / संस्थेस वैधता प्रमाणपत्र पाठविण्यात येते. श्रीमती मुलाणी यांच्या बाबतीत संबंधित संस्थेकडे प्रमाणपत्र त्यांच्याकडे दिले असावे, असे श्री. जाधव यांनी नमूद केले.

वरील परिस्थिती विचारात घेऊन आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

**आदेश**

१. अपील मान्य.

२. अपीलकर्त्याला हवे असलेले जात पडताळणीचे प्रमाणपत्र संबंधित संस्थेकडे पाठविले जात असल्यामुळे मुख्याध्यापक, प्राथमिक आश्रमशाळा, केम, ता. करमाळा यांच्याकडून दि. ३१.१२.२००७

पर्यंत देण्याची व्यवस्था सदस्य सचिव, जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र. १, पुणे यांनी करावी. त्याबाबतचा पूर्तता अहवाल त्यांनी दि. ५.१.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

३. अपिलाची दखल न घेतल्याबाबत तत्कालीन अपिलीय प्राधिकारी - अध्यक्ष, जाती पडताळणी समिती तथा अतिरिक्त आयुक्त, महसूल विभाग, पुणे यांना समज देण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. १९ .१२.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तु सखाराम बाबर
मु.सरापुवाडी, पो.निरवांगी, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, इंदापूर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास
सेवा योजना, इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१२.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दत्तु सखाराम बाबर
मु.सरापुवाडी, पो.निरवांगी, ता.इंदापूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, इंदापूर, जि.पुणे श्री.डी.ए.वानखेडे

**जन माहिती अधिकारी** तथा बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास
सेवा योजना, इंदापूर, जि.पुणे प्रभारी श्रीमती जे.आर.राव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.११.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.२.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सन २००४ ते २००६ या काळात इंदापूर तालुक्यात महिला व बालविकास विभागामार्फत अंगणवाडी सेविका, बालवाडी सेविका व मदतनीस या पदासाठी आलेल्या उमेदवारांची वैयक्तिक माहिती (बायोडाटा), निवडण्यात आलेल्या उमेदवारांचे व फेटाळण्यात आलेल्या उमेदवारांचे निकष. मागितलेली माहिती गाववार देण्यात यावी. | |

## विवेचन

इंदापूर तालुक्यातील महिला व बालविकास विभागामार्फत अंगणवाडी सेविका, बालवाडी सेविका व मदतनीस या पदांसाठी आलेल्या उमेदवारांची वैयक्तिक माहिती (बायोडाटा) व उमेदवार निवडीचे निकष यांची २००४, २००५, २००६ अशा तीन वर्षांमधील गाववार माहिती अपीलकर्ता श्री.दत्तू सखाराम बाबर यांनी जन माहिती अधिकारी तथा बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना, इंदापूर यांच्याकडे मागितली होती. महाराष्ट्र माहितीचा अधिकार कायदा, नियम क्र.७(च) अन्वये एखाद्या व्यक्तीच्या सेवाअभिलेखाशी संबंधित असलेली माहिती देता येणार नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना कळविले. त्याविरुध्द श्री.बाबर यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, इंदापूर यांच्याकडे अपील केले. केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अस्तित्वात आल्यानंतर महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००२ निरसित झालेला असल्यामुळे व मागितलेली माहिती केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ८ अन्वये माहिती प्रकट करण्याबाबत असलेल्या अपवादात्मक तरतुदीखाली येत नसल्याचे नमूद करुन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय अयोग्य ठरविला व सात दिवसांच्या आत माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचा आदेश दिला. त्यानंतरही संपूर्ण माहिती न

मिळाल्याच्या कारणावरुन श्री.बाबर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना, इंदापूर श्री.गहिनीनाथ चव्हाण यांनी जाणीवपूर्वक माहिती दडविण्याचा प्रयत्न केलेला आहे, त्याबद्दल त्यांच्यावर दंडात्मक व कार्यालयीन शिस्तभंगाची कारवाई व्हावी व आपल्याला अपेक्षित माहिती मिळावी, असे श्री.बाबर यांनी या अपिलात नमूद केले आहे.

श्री.बाबर यांची पत्नी श्रीमती राधिका दत्तू बाबर यांनी मदतनीस या पदासाठी अर्ज केला होता, परंतु त्यांची निवड झाली नसल्यामुळे रागापोटी श्री.बाबर असे अर्ज करीत आहेत, त्यात लोकहिताचा दृष्टिकोन नाही, असे श्री.गहिनानाथ चव्हाण यांनी या पत्रात नमूद केले आहे. आपल्या पत्नीची निवड झाली नाही ही वस्तुस्थिती असली तरी माहिती मागणीचे ते केवळ निमित्त आहे, मुख्य उद्देश नाही. आरोप म्हणजे विषयाला वेगळे वळण देऊन दिशाभूल करण्याचा प्रयत्न आहे, असे प्रतिपादन श्री.बाबर यांनी आयोगापुढील सुनावणीत केले.

आपल्याला अंगणवाडी सेविकांची माहिती मिळाली, परंतु वैयक्तिक (बायोडाटा) माहिती मिळाली नाही, असे श्री.बाबर यांनी सांगितले. काही माहिती द्यावयाची राहिली होती, परंतु गटविकास अधिकाऱ्यांच्या आदेशाप्रमाणे दि.७.२.२००७ रोजी श्री.बाबर यांना माहिती देऊ केली असता त्यांनी ती स्वीकारली नाही, त्यामुळे ती रजिस्टर पोस्टाने पाठविली, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.गहिनानाथ चव्हाण यांनी गटविकास अधिकाऱ्यांना कळविल्याच्या पत्राची प्रत उत्तरवादी यांच्या वतीने आयोगाला सादर करण्यात आली.

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. गहिनीनाथ चव्हाण यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशा नंतरही चुकीची, अपुरी व विलंबाने माहिती दिल्याचे श्री. बाबर यांचे म्हणणे आहे. या संदर्भात खुलासा करण्याचा आदेश श्री. चव्हाण यांना विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर यांच्यामार्फत आयोगाने दिला होता. त्यानुसार श्री. चव्हाण यांनी (सध्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, रत्नागिरी ) यांनी दि. २०.१२.२००७ च्या पत्रान्वये पाठविलेला खुलासा आयोगाला दि. २६.१२.२००७ रोजी प्राप्त झाला आहे. बालविकास प्रकल्प कार्यालयाने पूर्ण विचार करुन व वरिष्ठ कार्यालयाचा सल्ला घेऊन श्री. बाबर यांना माहिती दिली. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर देऊ केलेली माहिती श्री. बाबर

यांनी न स्वीकारल्यामुळे त्याच दिवशी त्यांना टपालाने पाठवून दिली. श्री. बाबर दारिद्र्य रेषेखाली असल्याबाबतचा पुरावा त्यांनी दिला नसतानासुध्दा प्रकल्प कार्यालयाने त्यांना माहिती दिली. 'या बाबतचा निर्णय माझ्या एकट्याचा नव्हता, तर वरिष्ठ कार्यालयाच्या सल्याने घेतलेला तो प्रकल्प-कार्यालयाचा निर्णय होता,' असे श्री. चव्हाण यांनी नमूद केले आहे. वरिष्ठांशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती श्री. चव्हाण यांनी सोबत सादर केल्या आहेत. श्री. बाबर यांच्या संदर्भात 'माझ्या पत्नीची निवड झाली असती तर माहिती मागण्याचा प्रश्नच येत नव्हता' असे त्यांनी प्रकल्प कार्यालयात अनेक वेळा बोलून दाखविले आहे, माहितीच्या अधिकारात अर्ज दाखल करणे, माहिती समक्ष घेतो असे नमूद करणे, माहिती घेताना हुज्जत घालणे, मुदत संपण्यापर्यंत माहिती न स्वीकारणे ही त्यांची प्रवृत्ती आहे, अशा वैयक्तिक स्वरुपाची अन्य विधाने त्यांच्या खुलासा पत्रात आहेत.

श्री. बाबर यांना अपेक्षित असलेली सर्व माहिती देण्यात आली असून आणखी काही तपशील राहिला असल्यास पुरविला जाईल, असे जन माहिती अधिकारी तथा प्रभारी बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना, इंदापूर श्रीमती जे.आर.राव यांनी सांगितले.

दिलेली माहिती न स्वीकारण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

(१) अपील अमान्य.

(२) केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अस्तित्वात आल्यानंतर निरसीत झालेल्या महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियमाचा उल्लेख करुन माहिती नाकारण्याचा तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा बालविकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना, इंदापूर श्री.गहिनीनाथ चव्हाण यांचा निर्णय योग्य नाही. याबाबत श्री. चव्हाण यांना समज देण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २७.१२.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सुरेश बलभीम भोसले
रा. डि. ० अवंती नगर, लोकमंगल पतसंस्थेसमोर,
सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
छत्रपती शिवाजी प्रशाला, १०१ - ब,
मुरारजी पेठ, सोलापूर - ४१३ ००२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७७ / सोलापूर |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | २१.८.२००६ |
| ३ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | १६.९.२००६ |
| ४ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>मुख्याध्यापिका, छत्रपती शिवाजी प्रशाला, सोलापूर आरडी पुस्तकामध्ये २८००/- (दोन हजार आठशे ) रूपयांचा अपहार केला. चौकशी वेळेस रु. २०००/- भरले, अद्याप ८००/- रूपये भरणे बाकी आहेत, वरीलबाबत कागदपत्राच्या प्रती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सुरेश बलभीम भोसले यांनी मुख्याध्यापिका तथा जन माहिती अधिकारी, छत्रपती शिवाजी प्रशाला, सोलापूर यांच्याकडे आर.डी. बाबत केलेल्या व्यवहाराची माहिती मागितली होती. त्यानंतर आवश्यक ती माहिती न मिळाल्याने अपीलकर्ता श्री. भोसले यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. या कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या अपिलाच्या अनुषंगाने संबंधितांकडे आयोगाच्या दि. २९.१०.२००७ रोजीच्या पत्रान्वये विचारणा करण्यात आली. मागितलेली माहिती आपल्याला मिळाली असल्याने अर्ज मागे घेत असल्याबद्दल श्री. भोसले यांनी जन माहिती अधिकारी यांना कळविले आहे. सदर अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी दि. ५.१२.२००७ च्या पत्रासोबत आयोगास पाठविला आहे.

वरील विवेचन विचारात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. २६ .१२.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

सौ. मंदा नामदेव म्हात्रे
ब्लॉक क्र.१२, पहिला मजला,
बिल्डिंग क्र.४४-बी, वृंदावन सोसायटी,
ठाणे (पश्चिम), जि. ठाणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
प्रभारी संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
उपसंचालक, नगर रचना,
मुख्य कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८५३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | ११.१२.२००७ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ. मंदा नामदेव म्हात्रे, ब्लॉक क्र.१२, पहिला मजला, बिल्डिंग क्र.४४-बी, वृंदावन सोसायटी, ठाणे (पश्चिम), जि. ठाणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रभारी संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे
श्री. राजन अ. कोप

**जन माहिती अधिकारी** तथा उपसंचालक, नगर रचना, मुख्य कार्यालय, पुणे
श्री. प्र. ग. भुक्ते

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | १९.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | ३१.१२.२००५ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | १०.१.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | २१.४.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>मौजे पनवेल येथील स.क्र. ४२९ व ४२९-अ मध्ये पाडण्यात आलेले अंतिम भूखंड व त्यांचे अंतिम क्रमांक कोणते याची माहिती | |

## विवेचन

मौजे पनवेल येथील स.क्र.४२९ व ४२९-अ मधून पाडण्यात आलेले अंतिम भूखंड व त्यांचे क्रमांक कोणते, अशी माहिती अपीलकर्त्या सौ. मंदा नामदेव म्हात्रे यांनी जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, मुख्य कार्यालय, पुणे यांच्याकडे मागितली होती. नगर रचना योजना पनवेल क्र. १ ( प्रथम फेरबदल) साठी लवाद म्हणून सहाय्यक संचालक, नगररचना, अलिबाग यांची नेमणूक झाली असून त्यासंबंधित सर्व अभिलेख त्यांच्या अलिबाग कार्यालयात उपलब्ध आहेत. त्यांची पहाणी करुन आपल्याला हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रतींसाठी विनंती करावी, असे जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, नगर रचना, मुख्य कार्यालय, पुणे यांनी त्यांना कळविले. त्याविरुध्द सौ. म्हात्रे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे अपील केले. मागितलेली माहिती तांत्रिक स्वरुपाची असून यामध्ये नकाशाचा अर्थ लावणे अभिप्रेत असल्यामुळे लिखित स्वरुपात ऊहापोह करण्याऐवजी सौ. म्हात्रे यांनी वरीलप्रमाणे अलिबाग कार्यालयाशी संपर्क साधून अधिक माहिती घेणे योग्य होईल, हे जन माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे मान्य करुन अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अपील फेटाळले. त्याविरुध्द सौ. म्हात्रे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिलेली नसतानाही त्यांना दोषी ठरविले नाही, तसेच आपल्याला दिलेल्या माहितीची प्रत उपसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांना अर्जदाराच्या अपिलावर अयोग्य निर्णय व्हावा यासाठी पाठविली व अपीलकर्त्याला आर्थिक भूर्दंड पडला, असे कारण या अपिलात नमूद केले आहे.

आपण एक संरक्षित कुळ असून पनवेल नगर रचना योजनेमध्ये आपली जमीन सर्व्हे क्र. ४२९ समाविष्ट आहे, असे सौ. म्हात्रे यांचे म्हणणे असून हा विषय त्या माहितीच्या अधिकाराबरोबरच अन्य प्रशासकीय स्वरुपातील अर्जांद्वारेही सातत्याने मांडत आल्या आहेत, असे आयोगाला सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. माहितीच्या अधिकारातील व प्रशासकीय विभागाकडील अर्जांवर वेळोवेळी त्यांना उत्तर देण्यात आले आहे. अंतिम भूखंड क्रमांक कोणते आहेत याची माहिती दिली आहे, त्याची कारणे लवादाच्या निर्णयात आहेत, असे त्यांनी सांगितले.

सहाय्यक संचालक, नगर रचना, अलिबाग यांच्याविरुध्द कोणाकडे तक्रार करावी या मुद्याची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना दिली नव्हती. मात्र ती देणे अनावधानाने राहून गेले, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीत नमूद केले होते, असे अपिलीय प्राधिकारी तथा संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात स्पष्ट केले आहे.

सौ. म्हात्रे यांना वेळोवेळी माहिती देण्यात आली आहे, हा विषय तांत्रिक स्वरुपाचा असून यामध्ये नकाशाचा अर्थ लावणे अभिप्रत आहे, हे प्रभारी संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री. राजन कोप यांनी विस्ताराने स्पष्ट केले. या संदर्भात उच्च न्यायालयात दाखल झालेला दावा जमिनीच्या मालकी हक्काचा मूळ प्रश्न तहसीलदारांकडे सोपविण्यात आला असल्याने फेटाळला गेला असल्याचे त्यांनी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

नकाशाचा अर्थ लावणे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नसल्यामुळे व संबंधित माहितीबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी स्पष्टीकरणासह तपशील अपीलकर्त्यास पुरविला असल्यामुळे अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. २०.१२.२००७

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शरद सरदारसिंग परदेशी
रा.ब-४१३, निसर्ग दर्शन, सेक्टर-२६, प्राधिकरण,
निगडी, पुणे-४४

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचीव, पुणे विद्यापीठ, पुणे-७

**जन माहिती अधिकारी** पुणे विद्यापीठ, पुणे-७ उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८९१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.१२.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शरद सरदारसिंग परदेशी
रा.ब-४१३, निसर्ग दर्शन, सेक्टर-२६, प्राधिकरण,
निगडी, पुणे-४४

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचीव, पुणे विद्यापीठ, पुणे-७
डॉ.संजीव सोनावणे

**जन माहिती अधिकारी** पुणे विद्यापीठ, पुणे-७
श्री.बी.डी.उढाणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.३.२००७ |

| ८ | <u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u><br><br>बीएसएल परीक्षा ऑक्टोबर-२००६ मधील सिव्हील प्रोसिजर कोड, लँड लॉज, इंटरप्रिटेशन ऑफ स्टेटस, अॅडमिनिस्ट्रेटीव्ह लॉ या विषयाच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती मिळण्याबाबत. |
|---|---|

## विवेचन

बीएसएल परीक्षेतील आपल्या सिव्हील प्रोसिजर कोड, लँड लॉज इत्यादी चार विषयांच्या उत्तरपत्रिकांच्या प्रती अपीलकर्ता श्री.शरद सरदारसिंग परदेशी यांनी पुणे विद्यापीठाचे जन माहिती अधिकारी  यांच्याकडे मागितल्या होत्या, परंतु विद्यापीठ अध्यादेश क्र.१४९ कलम ८ नुसार उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत उपलब्ध करुन देता येणार नाही, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना कळविले. त्याविरुध्द श्री.परदेशी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा कुलसचीव, पुणे विद्यापीठ यांच्याकडे अपील केले.तत्कालीन अपिलीय प्राधिकारी डॉ.डी.डी.देशमुख यांनी हे अपील फेटाळले. त्याविरुध्द श्री.परदेशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये सार्वजनिक प्राधिकरणांच्या कामात पारदर्शकता आणणे व उत्तरदायित्व वाढविणे हा उद्देश नमूद केला आहे. उत्तरपत्रिकेच्या प्रती न देणे या उद्दिष्टांच्या विरुध्द आहे. तसेच आपल्याला त्यामुळे नैसर्गिक न्यायही नाकारला जात आहे, असे प्रतिपादन श्री.परदेशी यांनी आयोगापुढील सुनावणीत केले. पुणे विद्यापीठ अध्यादेश क्र.१४९ हा नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणारा असल्याने तो रद्द करावा, अशी मागणी त्यांनी लेखी व तोंडी निवेदनाद्वारे केली. इतर अनेक विद्यापीठांमध्ये उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती दिल्या जातात. पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.नरेंद्र जाधव यांनी पुणे विद्यापीठातही उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती संबंधितांना पुरविणार असल्याचे जाहीर केले आहे. या स्थितीत आपल्याला प्रती नाकारणे अन्याय्य व विद्यापीठाच्या कुलगुरुंनी जाहीर केलेल्या धोरणाशी विसंगत आहे, असे प्रतिपादन श्री.परदेशी यांनी केले.

उत्तरपत्रिका या विद्यापीठाला विद्यार्थ्यांशी असलेल्या विश्वासाश्रित संबंधामुळे प्राप्त झालेल्या असतात. त्यामुळे केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५, कलम ८(१) (इ) अन्वये अशी माहिती जाहीर न करणे योग्य आहे. तसेच एखाद्या विद्यार्थ्याने मागितलेल्या उत्तरपत्रिका ही वैयक्तिक माहितीची मागणी आहे, त्यात सार्वजनिक हिताचा पश्न येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.बी.डी.उढाणे यांनी केले. विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार माहिती नाकारली असून कुलगुरुंनी जाहीर केल्याप्रमाणे उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती देण्याच्या दृष्टीने आवश्यक ती प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे, ती पूर्ण होण्यास ३ ते ४ महिन्यांचा कालावधी लागेल, मात्र ती पूर्ण होऊन नवीन नियम अस्तित्वात येईपर्यंत सध्याच्या नियमाप्रमाणेच कार्यवाही करणे आवश्यक आहे, असेही श्री.उढाणे यांनी स्पष्ट केले.

उभय बाजूंचे प्रतिपादन व सादर करण्यात आलेल्या कागदपत्रे घेता पुढील निष्कर्ष निघतात:

(१) विद्यापीठाच्या प्रचलित नियमाप्रमाणे जन माहिती अधिकाऱ्यांनी कार्यवाही केली आहे.

(२) केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अपेक्षित असलेल्या सार्वजनिक प्राधिकरणामधील पारदर्शकतेच्या दृष्टीने उत्तरपत्रिकांबाबत विद्यापीठाने अधिक खुलेपणाचे धोरण स्वीकारणे आवश्यक आहे. याबाबतची प्रक्रिया विद्यापीठाने शक्य तितक्या लवकर पूर्ण करणे उचित ठरेल.

(३) विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका विद्यापीठाला विश्वासाश्रित संबंधामुळे प्राप्त होतात, हे प्रतिपादन योग्य नाही. परीक्षा/उत्तरपत्रिका हा विद्यापीठाच्या शैक्षणिक व्यवस्थेतील नियमांच्या पूर्ततेचा एक भाग आहे.

(४) अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपीलकर्त्याला बाजू मांडण्याची संधी दिलेली नाही, त्यांनी केवळ विद्यापीठातील अधिकाऱ्यांची बाजू ऐकून घेतली, हे योग्य नाही. विषयाचे स्वरुप विवाद्य नसेल किंवा संबंधित सर्व बाजूंची भूमिका उपलब्ध कागदपत्रांमधून स्पष्ट होत असेल तर त्या आधारे निर्णय करणे समर्थनीय ठरु शकते. परंतु तसे नसल्यास उभय बाजूंना (प्रस्तुत अपिलाच्या संदर्भात अपीलकर्त्याला) लेखी अथवा तोंडी बाजू माडण्याची संधी दिली गेली पाहिजे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार उत्तरपत्रिकेच्या छायांकित प्रती नाकारण्याचा जन माहिती अधिकाऱ्यांचा निर्णय योग्य आहे.

(३) अनेक विद्यापीठांमध्ये उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती निर्धारित शुल्क आकारुन विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार त्यांना पुरविल्या जातात. परीक्षा पध्दतीतील व विद्यापीठाच्या एकूणच शैक्षणिक कारभारातील पारदर्शकता व विश्वासार्हता वाढण्याच्या दृष्टीने ते महत्त्वाचे आहे. उत्तरपत्रिकांच्या मागणीसाठी परीक्षेच्या निकालानंतरची कालमर्यादा व विशिष्ट शुल्क निश्चित करुन पुणे विद्यापीठाने याबाबतची प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. २७.१२.२००७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. ज्ञानेश्वर सिताराम कराळे
मु.पो. देहुगाव, ता. हवेली, जि. पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
उपनोंदणी महानिरीक्षक (मुख्यालय)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे -४११ ००१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
कार्यासन अधिकारी क्र.९,
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे -४११ ००१

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडें अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
| --- | --- | --- | --- | --- |
| ९३३ / पुणे | ३.३.२००७ | २.४.२००७ | १८.४.२००७ | १२.६.२००७ |
| ९३४ / पुणे | २६.२.२००७ | २३.३.२००७ | १८.४.२००४ | १२.६.२००७ |
| ९३५ / पुणे | २६.२.२००७ | २३.३.२००७ | १८.४.२००७ | १२.६.२००७ |
| ९३६ / पुणे | २६.२.२००७ | २३.३.२००७ | १८.४.२००७ | १२.६.२००७ |

**मुळ अर्जात मागणी केलेली माहिती**

नोंदणी खात्यातील सह जिल्हा निबंधक, उपनोंदणी महानिरीक्षक व दुय्यम निबंधक श्रेणी १ पदाच्या भरतीची माहिती, दुय्यम निबंधकाच्या कार्यालयाची तपासणी व त्यावरील अंतिम आदेश, सन १९८० ते २००० पर्यंतच्या ज्येष्ठता यादीची व दुय्यम निबंधकाची माहिती, खात्यातील किती कर्मचाऱ्यांच्या/अधिकाऱ्यांच्या विभागीय चौकशा सुरु आहेत व त्या कोणत्या कारणाने सुरु आहेत, बदल्यांसारखे अति महत्वाचे निर्णय तत्कालीन नोंदणी महानिरीक्षक यांनी न घेता ते

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. विलास बापूराव मोहरीर
३०, नरसिंग गिरजी मील हौसिंग सोसायटी,
होटगी रोड, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन ) औरंगाबाद
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद, नळदुर्ग, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४ / सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | २०.३.२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | २०.४.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | ८.५.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | २.६.२००६ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्री. भास्कर बापूराव मोहरीर यांनी त्यांच्या नावे असलेली जागा त्यांची पत्नी सौ. भाग्यवती भास्कर मोहरीर यांचे नावे करताना सोबत जोडलेल्या कागदपत्राच्या सत्य प्रती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. विलास बापूराव मोहरीर यांना जन माहिती अधिकाऱ्यांकडून वर नमूद केलेली माहिती तीस दिवसांच्या विहित मुदतीत मिळाली नाही. नगर परिषदेकडे अभिलेख कक्ष नसल्यामुळे नामांतरण विभागाकडे संचिका आढळ होत नाही, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,

नगरपरिषद, नळदुर्ग यांनी कळविले. जन माहिती अधिकाऱ्यांनी आठ दिवसात संबंधित कागदपत्रांची स्वत: चौकशी करावी व संचिका गहाळ होण्यास जे कर्मचारी जबाबदार असतील त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी, असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) औरंगाबाद श्री. डी.एम. मुगळीकर यांनी या विषयाच्या अनुषंगाने अपिलात दिला. याच विषयाच्या अनुषंगाने अन्य अपिलात निर्णय देताना अपिलीय प्राधिकाऱ्यांनी १८/- रुपये शुल्क अपीलकर्त्यास परत करण्याचे आदेश जन माहिती अधिकाऱ्यांना दिले होते. या विषयाबाबत श्री. मोहरीर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगापुढील सुनावणीला अपीलकर्ता उपस्थित नव्हते. तसेच पूर्वसूचना देऊनही त्यांनी कोणतेही निवेदन सादर केलेले नाही. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, नळदुर्ग, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांनी ते उपस्थित राहू शकत नसल्याचे कळविले. श्री. मोहरीर यांना आवश्यक ती माहिती पुरविल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे. मात्र श्री. मोहरीर यांचे या माहितीने समाधान झालेले दिसत नाही, असे त्यांनी अपिलात केलेल्या उल्लेखावरुन दिसते. गहाळ झालेल्या संचिकेबाबत चौकशी करुन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, नळदुर्ग, यांनी जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी या अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशाबाबत कोणती कृती केली याचा उल्लेख जन माहिती अधिकाऱ्यांच्या निवदेनात नाही. या बाबी स्पष्ट होणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशत: मान्य.

२. संचिका गहाळ होण्यास जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याच्या अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या आदेशाबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. १५.१.२००८ पर्यंत जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि. २९.१२.२००७**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. ज्ञानेश्वर सिताराम कराळे
मु.पो. देहुगाव, ता. हवेली, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
उपनोंदणी महानिरीक्षक (मुख्यालय)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे -४११ ००१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
कार्यासन अधिकारी क्र.९,
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे -४११ ००१

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडें अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ९३३ / पुणे | ३.३.२००७ | २.४.२००७ | १८.४.२००७ | १२.६.२००७ |
| ९३४ / पुणे | २६.२.२००७ | २३.३.२००७ | १८.४.२००४ | १२.६.२००७ |
| ९३५ / पुणे | २६.२.२००७ | २३.३.२००७ | १८.४.२००७ | १२.६.२००७ |
| ९३६ / पुणे | २६.२.२००७ | २३.३.२००७ | १८.४.२००७ | १२.६.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

नोंदणी खात्यातील सह जिल्हा निबंधक, उपनोंदणी महानिरीक्षक व दुय्यम निबंधक श्रेणी १ पदाच्या भरतीची माहिती, दुय्यम निबंधकाच्या कार्यालयाची तपासणी व त्यावरील अंतिम आदेश, सन १९८० ते २००० पर्यंतच्या ज्येष्ठता यादीची व दुय्यम निबंधकाची माहिती, खात्यातील किती कर्मचाऱ्यांच्या/अधिकाऱ्यांच्या विभागीय चौकशा सुरु आहेत व त्या कोणत्या कारणाने सुरु आहेत, बदल्यांसारखे अति महत्वाचे निर्णय तत्कालीन नोंदणी महानिरीक्षक यांनी न घेता ते

| | |
|---|---|
| | तत्कालीन उपनोंदणी महानिरीक्षक यांनीच घेतले आहेत हे खरे आहे काय व त्या काळात ज्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या झाल्या त्यांची नावे, उपनोंदणी महानिरीक्षक श्री. वसंतराव मस्के हे नोंदणी खात्यात केव्हा रुजू झाले व आजपर्यंत त्यांनी कोणकोणत्या पदावर काम केले त्याचा कालावधी, महालेखापाल नागपूर व मुंबई यांच्या तपासणी पथकाने वेळोवेळी केलेल्या तपासणीत त्यांना कोणकोणते आक्षेप / दोष आढळले त्या तपासणी अहवालाच्या प्रमाणित प्रती इत्यादी विविध मुद्यांची माहिती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. ज्ञानेश्वर सिताराम कराळे यांनी नोंदणी खात्यातील ७३ विषयाबाबतची विस्तृत माहिती जन माहिती अधिकारी तथा कार्यासन अधिकारी क्र.९, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१ यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत माहिती दिली. परंतु या माहितीने समाधान न झाल्याने श्री. कराळे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपनोंदणी महानिरीक्षक (मुख्यालय), नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे अपील दाखल केले. त्यांनी ते फेटाळल्यामुळे श्री. कराळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपिलांच्या अनुषंगाने आयोगाने दि. २१.११.२००७ रोजीच्या पत्रान्वये सर्व संबंधितांना विचारणा केली होती. त्यानुसार उभय बाजूंनी निवेदन सादर केले असून या अपिलांबाबत कोणतीही तक्रार राहिली नसल्याने अपिले निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि. १२.१२.२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

सबब, आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे**

**पुणे**
**दि. २८.१२.२००७**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे विभाग) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.कृष्णा विश्वनाथ जंगम
मु.पो.ता.वाळवा, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, औद्योगिक न्यायालय, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, चेतना कॉलेजजवळ, वांद्रे पूर्व,मुंबई-५७ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सदस्य, औद्योगिक न्यायालय, १८३/१८४, वसंत मार्केट यार्ड, सांगली-४१६४१६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९४ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.११.९.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कृष्णा विश्वनाथ जंगम
मु.पो.ता.वाळवा, जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, औद्योगिक न्यायालय,
प्रशासकीय इमारत, पहिला मजला,
चेतना कॉलेजजवळ, बांद्रे पूर्व,मुंबई-५७
प्रतिनिधी :प्रबंधक श्री.के.जी.साठे

**जन माहिती अधिकारी** तथा सदस्य, औद्योगिक न्यायालय, १८३/१८४,
वसंत मार्केट यार्ड, सांगली-४१६४१६ श्री.एस.एल.पठाण

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.१.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.३.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>औद्योगिक कामगार न्यायालयातील दावा क्र.३/२००२ मधील अजामीनपात्र वॉरंट व आरोपींची हजेरी-गैरहजेरी याबाबतची माहिती | |

## विवेचन

औद्योगिक कामगार न्यायालयातील दावा क्र.३/२००२ मधील अजामीनपात्र वॉरंट व आरोपींची हजेरी-गैरहजेरी याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.कृष्णा विश्वनाथ जंगम यांनी न्यायाधीश, कामगार न्यायालय, सांगली यांना जन माहिती अधिकारी संबोधून त्यांच्याकडे मागितली होती. परंतु आपण मागितलेली माहिती प्रशासकीय माहिती नसून न्यायालयीन बाब आहे, असे नमूद करुन त्यांनी त्याबाबतच्या प्रती न्यायालयाकरवी प्राप्त करण्याविषयीची माहिती दिली. त्याविरुध्द श्री.जंगम यांनी सदस्य, औद्योगिक न्यायालय, सांगली यांच्याकडे केलेले अपील त्यांनी अपिलीय प्राधिकारी असलेले अध्यक्ष, औद्योगिक न्यायालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे पाठविले. त्यानंतर त्यांना माहिती देण्यात आली. परंतु आपल्याला मिळालेली माहिती अपुरी असल्याचे कारणावरुन श्री.जंगम यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.जंगम यांना शुल्क कळवून संबंधित कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. कोणती माहिती अपुरी आहे हे श्री.जंगम आयोगापुढील सुनावणीच्या वेळी स्पष्ट करु शकले नाहीत. मूळ अर्जानुसार त्याचा तपशील त्यांनी सादर केल्यास संबंधित माहिती देता येईल, असे जन माहिती अधिकारी तथा सदस्य, औद्योगिक न्यायालय, सांगली श्री.एस.एल.पठाण यांनी स्पष्ट केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे:

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) मूळ अर्जात मागितलेल्या माहितीतील कोणता तपशील अपुरा आहे, हे श्री.जंगम यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना लेखी सादर करावे व संबंधित माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी त्वरित द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याच्या पूर्ततेचा अहवाल जन माहिती अधिकारी श्री.एस.एल.पठाण यांनी दि.१०.१.२००८ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि. २७.१२.२००७